# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/ AUR / 124 /2008 / 45/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**O&M Circle , M.S.E.D.C.L.,Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Chairman, Aurangabad Coop.Industrial Estate, Rly.Station MIDC, Aurangabad. (Consumer No. 490010523483)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Chairman, Aurangabad Coop. Industrial Estate, Rly.Station MIDC, Aurangabad. (Consumer No. 490010523483)

The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of wrong bills issued to him by the Distribution Licensee.

You are requested to submit your reply on the grievance of the consumer at the time of hearing .

**The hearing in this matter is kept on 27/08/208 at 16=00 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above**.

**Copy to :** The Chairman,
Aurangabad Coop.Industrial Estate,
Rly.Station MIDC, Aurangabad.
(Consumer No. 490010523483)

**BEFORE THE CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM**
**AURANGABAD ZONE, AURANGABAD**

( **Case No. CGRF / AZ /AUR /U / 124 / 2008 / 45** ).

**The Chairman**
**Aurangabad Coop.Industrial estate**
**Rly.Station MIDC,**
Aurangabad.
( Consumer No. 490010523483)

**Consumer Complainant.**

**V/s**

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPNAY LTD. Urban Circle,Aurangabad.**

**The Distribution Licensee.**

**Date:- 27.08.2008**

**Sub**: Grievance under the Maharashtra Electricity Regulatory Commission, (Consumer Grievance Redressal Forum and Ombudsman) Regulations, 2006.

**INTERIM ORDER**

The consumer has filed an application for passing interim order directing the Distribution Licensee for not to disconnect his electricity supply on the grounds that the bills issued by the Distribution Licensee are incorrect .

The grievance of the consumer was admitted as per Regulation No. 6.5 of Maharashtra Electricity Regulatory Commission The hearing on the application of the consumer was kept on 27.08.08.

On the date of hearing , consumer representative Shri Kokade and Nodal Officer of Distribution Licensee Shri Rathore alongwith Shri Gaikwad, Dy.Ex.Engineer ,Chavani sub division were present. The Nodal officer filed his reply along with CPL.

.

Cont:

Heard both the parties. We observed that the bills from Feb.2007 to Jan.2008 were issued on average basis even though the meter was in working condition. The bills are therefore required to be revised by splitting the consumption over a period of 13 months. The last bill issued to the consumer is of Rs.15731.30

In view of the above observations and as per provision No.6.5, of the Regulation 2006, the Forum hereby direct the D.L. not to disconnect the electricity supply of the consumer till redressal of his grievance and further direct to submit revise bill before 8$^{th}$ Sept.2008. The consumer is directed to pay Rs. 10,000/ ( Rs Ten thousand only) before 5$^{th}$ Sept.2008.as part payment.

The next date of hearing is kept on 09.09.08

| | | |
|---|---|---|
| ( H.A.Kapadia) | ( A.N.Sonwane ) | (V.A.Hambire) |
| Member | Member/Secretary | President |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२४/२००८/४५**

**तक्रार दाखल दिनांक ;- २६/०८/२००८**
**निकाल दिनांक ;- १६/०९/२००८**

**अध्यक्ष,**
**औरंगाबाद सहकार औद्योगिक वसाहत मर्यादित,**
**एम.आय.डी.सी.रेल्वेस्टेशन,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०५२३४८३) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद.

विषयः- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल विनियम २००६) च्या अंतर्गत गा-हाणे.

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची- अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २६/०८/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २७/०८/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने व्यावसायीक कारणासाठी महावितरण कंपनीकडून वीज पुरवठा घेतला असून त्यांना डिसेंबर २००७ पर्यंत मीटर वरील रिडिंगप्रमाणे वीज बिल आकरण्यात येत होते. ज्याचा नियमीतपणे भरणा त्यांनी केला आहे. त्यानंतर त्यांना सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले. फेब्रुवारी २००८ मध्ये २७४६ युनिट वीज वापराचे वीज बिल देण्यात आले. अर्जदाराने अनेक वेळा मीटर रिडिंगप्रमाणे वीज बिल आकारण्यासाठी केलेली तक्रारीची दखल महावितरण कंपनीने न घेतल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली आहे, व मीटर रिडिंगप्रमाणे व्याज व दंड न आकारता वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे. त्याचप्रमाणे या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडित होणार नाही याबाबत अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक २७/०८/२००८रोजी अर्जदाराचा अंतरिम आदेश पारीत करण्याबाबत अर्जावर सुनावणी ठेवण्यात आली. अर्जदार प्रतिनिधी श्री कोकाडे उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री राठोड तसेच श्री गायकवाड उपकार्यकारी अभियंता छावणी उप विभाग उपस्थित होते. मीटर चालु स्थितीत असतांना महावितरण तर्फे अर्जदार यांना सतत सरासरीवर आधारित वीज बिल आकारण्यात आले

असल्याचे आढळुन आले. त्याच प्रमाणे फेब्रुवारी २००८ या महिन्याचे ग्राहकास देण्यात आलेले २७४३ युनिट वीज वापराचे बिल हे सरासरी वापरापेक्षा जास्त आढळुन आल्यामुळे मंचाने अर्जदाराच्या गा-हाण्याचे निराकारण होईपर्यंत व अर्जदाराने रूपये १०,०००/- भरल्यास त्याचा वीज पुरवठा खंडित न करण्याबाबत अंतरिम आदेश पारीत केला व पुढील सुनावणी दिनांक ०९/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०९/०९/२००८ रोजी अर्जदार प्रतिनिधी श्री कोकाडे तसेच नोडल अधिकारी श्री राठोड उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मीटर रिडिंग उपलब्ध नसल्यामुळे सरासरीवर आकारण्यात आलेले वीज बिल विभागुन देण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराने फेब्रुवारी २००७ मध्ये भरलेले ३८००/- रूपये ची नोंद महावितरणने घेतली नसल्याचे सांगितले मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर नोडल अधिकारी यांना अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट करून वीज बिल दुरूस्त करून ते वीज बिल मंचास दिनांक १२/०९/२००८ रोजी दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदारास या सुधारीत वीज बिला बाबत आक्षेप असल्यास तो दिनांक १२/०९/२००८ पर्यंत दाखल करण्याचे सांगण्यात आले व पुढील सुनावणी १६/०९/२००८रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक १६/०९/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी नोडल अधिकारी उपस्थित नव्हते पण त्यांनी मंचाच्या आदेशाप्रमाणे अर्जदारास देण्यात येणा-या वीज बिलाची प्रत मंचात दाखल केली ग्राहक प्रतिनिधी यांनी हे सुधारीत वीज बिल चुकीचे असल्याचे सांगत वीज बिल मान्य नसल्याचे सांगितले.

५) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून अर्जदाराचे सि.पी.एल. तसेच नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सुधारीत वीज बिलाचे अवलोकन केल्यावर असे आढळुन येते की, अर्जदारांनी सहकारी औद्योगिक वसाहतच्या कार्यालयासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला आहे.

जानेवारी २००७ पर्यंत त्यांना मिटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल देण्यात येत होती फेब्रुवारी २००७ ते जानेवारी २००८ नंतर त्यांना मिटर व्यवस्थीत असतांना देखील सरासरीवर आधारीत २११ युनिट वीज वापराचे बिल देण्यात आले. फेब्रुवारी २००८ मध्ये २७४३ युनिट व त्यानंतर मार्च २००८ मध्ये मिटर फॉल्टी दाखवत २११ युनिट सरासरीवर आधारीत तर एप्रील २००८ ते जुन २००८ या काळातील वीज बिले ही मिटरवरील नोंदीप्रमाणे देण्यात आलेली आढळुन येतात अर्जदाराचे मिटर हे २१/०८/२००८ रोजी बदलण्यात आले त्यावेळी जुन्या मिटरवरील रिडिंग ०५५६० असल्याचे मिटर बदली अहवालावरून आढळुन येते.

अर्जदाराचे मिटर हे वीज वापराची योग्य ती नोंद घेत असतांना महावितण कंपनीतर्फे रिडिंगची नोंद नियमीतपणे न घेतली गेल्यामुळे ग्राहकास सतत १२ महिने सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आले असल्याचे आढळते. त्याचप्रमाणे ग्राहकाने वेळोवेळी याबाबत केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात महावितरण तर्फे अक्षम्य दिरगांई झाल्याचे मंचास आढळुन येते.

अर्जदारास मिटरवरील नोंदीप्रमाणे जानेवारी २००७ मध्ये वीज बिल देण्यात आले त्यावेळी मिटरवरील चालु रिडिंग ही ९९७५ अशी होती. दिनांक२१/०८/२००८ रोजी मिटर बदलतांना रिडिंग ०५५६० अशी असल्यामुळे फेब्रुवारी २००७ ते २१/०८/२००८ या काळातील (१८ महिने) वीज वापर १०००० वजा ९९७५ अधिक ५५६० म्हणजेच ५५८५ असा आढळतो. या काळातील ग्राहकांचा वीज वापराची सरासरी ही अंदाजे ३०० युनिट एवढी येते. जे मिटरवरील नोंदीप्रमाणे बिल आकारण्यात आलेल्या वापराच्या सुसगंत असल्याचे आढळते.

वरील सर्व निदर्शनावरून मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे ग्राहकास देण्यात आलेले फेब्रुवारी २००७ व त्यापुढील सर्व वीज बिल रद्द करण्यात येत आहे.
२) महावितरण कंपनीने या काळात ग्राहकाने वापरलेल्या ५५८५ युनिट अठरा महिन्यात विभागुन द्यावे व ग्राहाकाने या काळात भरलेल्या रक्कमेची वजावट करून ३० दिवसाच्या आत सुधारीत वीज बिल द्यावे.
३) वरीलप्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड लावु नये.
४) ग्राहकास सतत सरासरीवर आधारीत वीज बिल देवुन त्याच्या तक्रारीची दखल न घेतल्यामुळे झालेल्या त्रासापोटी रूपये २५०/- द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२४/२००८/४५** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) अध्यक्ष,**
**औरंगाबाद सहकार औद्योगिक वसाहत मर्यादित,**
**एम.आय.डी.रेल्वेस्टेशन, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र ४९००१०५२३४८३)**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१२४/२००८/४५ गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**